THE RUBRICS
Journal of Interdisciplinary Studies
Volume 2 Issue 4 December 2016
www.magnuspublishing.com
ISSN 2454-1974

# गंगाखेड तालुक्यातील प्रवाह प्रणालीची घनता आणि वसाहतीचे वितरण

**प्रा.डॉ. विश्वराज श्रीरामराव चिमणगुंडे**
सहाय्यक प्राध्यापक, भूगोल विभाग
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड जि.परभणी

**ARTICLE INFO**

Received: 24 Oct. 2016
Reviewed: 12 Nov. 2016
Accepted: 26 Nov. 2016
Published: 5 Dec. 2016

**APA CITATION**

चिमणगुंडे विश्वराज (2016). गंगाखेड तालुक्यातील प्रवाह प्रणालीची घनता आणि वसाहतीचे वितरण. *The Rubrics Journal of Interdisciplinary Studies*, *2*(4), 81-85.

## सारांश

मानवाच्या मूलभुत गरजांपैकी पाणी ही एक महत्त्वाची गरज आहे. पाणी हे नैसर्गीक संसाधन आहे. मानव हा समाजप्रिय प्राणी असल्याने अनादी काळापासून समूह करुन राहण्याची प्रवृत्ती आजतागायत अव्याहत सुरु आहे. गुहा संस्कृतीत वावरणाऱ्या आदि मानवापासून अवकाश संस्कृतीपर्यंत पोहोचलेल्या आधुनिक मानवापर्यंत वस्ती किंवा अधिवास हा मानवाचा स्थायीभाव आहे. समूहप्रियतेच्या जाणिवेतून वस्त्यांचा उगम झाला. सतत भटके जीवन जगणारा अतिप्राचीन मानवदेखील स्थैर्याच्या शोधात होता तथापि शिकार, वनसंकलन यासारख्या उदरनिर्वाहक संस्कृतीत मानवाला स्थिर अधिवास नव्हता. मानवाचे तत्कालीन ज्ञान व तंत्र खूपच मर्यादित होते. लाखो वर्षे या आदिम अवस्थेत राहिल्यानंतर सुमारे दहा हजार वर्षापूर्वी शेतीची कला मानवाला अवगत झाली. येथूनच मानवाच्या स्थिर जीवनास सुरुवात झाली. विशेषत: नद्याच्या काठावर सुपिक मैदानी प्रदेशात मानवी वस्त्यांचा व तथाकथीत प्राचीन संस्कृतीचा उगम झाला.

# गंगाखेड तालुक्यातील प्रवाह प्रणालीची घनता आणि वसाहतीचे वितरण

**प्रा.डॉ. विश्वराज श्रीरामराव चिमणगुंडे**

## प्रस्तावना

पाणी हा मानवी जीवनाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा घटक आहे. जगात पाण्याच्या साठ्याजवळ नसणाऱ्या वसाहती अपवादात्मकच आहेत. आधुनिक काळात नळावाटे पाणी वाहून नेणे शक्य असल्याने जलस्थापनापासून दूर वसाहती होऊ शकतात. परंतू त्या वसाहतीमागे अन्य आर्थिक, धार्मिक, सामाजिक घटक कारणीभूत असतात. इतिहास काळांत डोंगरावर, किल्ल्यांत असणाऱ्या वसाहतींना सुध्दा मुबलक पाणी पूरवण्यासाठी विहीरी अथवा तलाव खोदलेले होते. परंतू सर्वसामान्यपणे नद्या, तलाव अथवा झऱ्याजवळ वसाहती केल्या जातात. अशा वसाहतींना जलाकर्षी वसाहती असे म्हणतात. नद्यांकाठी अथवा तलावाकाठी असलेल्या वसाहतींना पिण्यासाठी वापरासाठी तसेच शेती व उद्योगधंद्यासाठी मुबलक पाणी मिळते. शिवाय मासेमारी व्यवसायामुळे पूरक अन्न उपलब्ध होऊ शकते. वाळवंटात व डोंगराळ प्रदेशात झरे, विहीरी व पाणवठ्याच्या जागा असलेल्या ठिकाणी वसाहती केल्या जातात. त्यामुळे वसाहत निर्मिती मध्ये इतर भौगोलिक घटका बरोबर पाणी हा घटक ही तितकाच महात्त्वाचा मानला जातो. त्यामुळेच प्रस्तूत शोध निबंधामध्ये नद्या व वसाहतींचा भौगोलिक दृष्टीकोणातून अभ्यास केला आहे.

## बीज सज्ञा

प्रवाह प्रणाली, वसाहती (वस्ती), वितरण.

## शोधनिबंधाचा उद्देश

हा शोधनिबंध खालील दोन महत्वपूर्ण उद्देशांना अनुसरुन पूर्ण करण्यात आला आहे.

१) गंगाखेड तालुक्यातील ग्रामीण वसाहती नदीच्या काठावरच वसलेल्या आहेत.

२) गंगाखेड तालुक्यात ज्या प्रदेशात नदीचे प्रभाव क्षेत्र अधिक आहे त्याच क्षेत्रामध्ये ग्रामीण वसाहती जास्त आहेत.

## आधार सामग्री संकलन व संशोधन पध्दती

गंगाखेड तालुक्यातील प्रवाह प्रणालीची घनता व वसाहतीच्या वितरणाचा भौगोलिक अभ्यास करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरुपाच्या आधार सामग्रींचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक स्वरुपाच्या माहितीसाठी प्रत्यक्ष ग्रामीण क्षेत्राचे सर्वेक्षण केले आहे. दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीसाठी परभणी जिल्ह्याची जनगणना पुस्तिकेचा वापर करण्यात आला आहे.

## अभ्यास क्षेत्र

दक्षिण गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीच्या खोऱ्यात वसलेला गंगाखेड हा तालुका परभणी जिल्ह्याच्या दक्षिणेला आहे. गंगाखेड हे शहर गोदावरी नदीच्या तिरावर वसलेले आहे. त्यामुळे या शहरास

गंगाखेड नाव पडले आहे. कारण गोदावरी नदीला गंगा म्हणून संबोधले जाते. त्यामुळे या नदीचा गंगा हा शब्द व खेड म्हणजे वसाहत. या दोन्ही शब्दापासून या वसाहतीस गंगाखेड हे नाव पडले आहे. गंगाखेड हे शहर पूर्वी लहान वसाहत होती. नंतरच्या काळात लोकसंख्या वाढ झाली व खेड्याचा विस्तार वाढत गेला व एक शहर म्हणून आज गंगाखेड हे विकसीत झाले. आजही या शहराच्या परिसरातील ग्रामीण वसाहतीमध्ये या शहराला खेड म्हणूनच ओळखले जाते. संपूर्ण महाराष्ट्रात गंगाखेड हे शहर ओळखले जाते ते संत जनाबाई मुळे, संत जनाबाई (इ.स १२६० ते १३५३) चे जन्मस्थान हे गंगाखेडच आहे.

गंगाखेड तालुक्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°४२'२७" उत्तर ते १९°७' ५५" उत्तर तर रेखावृत्तीय विस्तार ७६°२६' २" पूर्व ते ७७°६' १५" पूर्व दरम्यान असून या तालुक्याच्या उत्तरेस परभणी, पूर्णा व पाथरी तालूके, पश्चिमेस बीड जिल्हा, तर दक्षिणेस लातूर जिल्हा तर पूर्वेस नांदेड जिल्ह्याची सीमा आहे. गंगाखेड तालूक्याच्या उत्तर सिमेवरुन गोदावरी नदी वाहते तर पश्चिम सीमेवरुन वान नदी वाहते तर दक्षिण सीमेवर बालाघाट डोंगररांगा पसरलेल्या आहेत. गंगाखेड तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ १५८३.२८ चौरस किलोमिटर आहे. गंगाखेड तालुक्याची पूर्व-पश्चिम लांबी ६९.९६ कि.मी तर उत्तर - दक्षिण लांबी ३५.१४कि.मी असून अविभक्त गंगाखेड तालुक्याचे क्षेत्र फळ १५८३.२८ चौरस किलोमिटर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार अविभक्त गंगाखेड तालूक्याची ग्रामीण लोकसंख्या २,७०,१८२ आहे तर, ग्रामीण लोकसंख्येची घनता दर चौरस किलोमिटरला १७१ एवढी आहे. परभणी जिल्ह्याच्या एकूण क्षेत्र फळापैकी २५.२० टक्के क्षेत्र गंगाखेड तालुक्याचे व्यापले आहे तर, महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्र फळापैकी ०.५१ टक्के क्षेत्र गंगाखेड तालुक्याने व्यापलेले आहे.

गंगाखेड तालूक्यात गंगाखेड, माखणी, राणीसावरगाव, सोनपेठ, आवलगाव, पालम व चाटोरी या प्रमुख ०७ सर्कलचा (महसुल मंडळाचा) समावेश होतो. तालुक्यात गंगाखेड व सोनपेठ येथे नगर पालिका आहेत तर, २०११ च्या जनगणनेनुसार गंगाखेड तालूक्यात २४८ ग्रामीण वसाहती आहेत. यापैकी २४६ वस्ती असलेल्या व ०२ (धुप्पा ओसाड व पोटा) वसाहती ओसाड आहेत. सर्कलनिहाय (महसूल मंडळनिहाय) अभ्यास क्षेत्रात सोनपेठ २७, आवलगाव ३३, गंगाखेड ३१, माखणी ३४, राणीसावरगाव ४१, पालम ४० व चोटीरी सर्कलमध्ये (महसूल मंडळामध्ये) ४२ ग्रामीण वसाहती आहेत.

## विषय विवेचन

पाणी हा मानवी जीवनाच्या दृष्टीने सर्वात महात्त्वाचा घटक आहे. जगात पाण्याच्या साठ्याजवळ नसणाऱ्या वसाहती अपवादात्मकच आहेत. प्राचीन काळी मानवी संस्कृतीचा उदय नदीच्या काठावर आणि नदीच्या खोऱ्यात झाला आहे. नाईल नदीच्या खोऱ्यात मिश्र संस्कृती (३००० ई.पू.) दजला-फिरात खोऱ्यात, सुमेरियन संस्कृती (२७०० ई.पू.) सिंधू नदीच्या खोऱ्यात सिंधु संस्कृती (२५०० ई.पू.) होआंगहो नदीच्या खोऱ्यात शान्ग संस्कृती (१३०० इ.पू) नायक्षर नदीच्या खोऱ्यात इन्का संस्कृती (१३०० इ.पू.) चा विकास झाला. यावरुन असे लक्षात येते की मानवी वसाहतीची उत्पत्ती ही नद्याच्या खोऱ्यात मुबलक पाणी पुरवठ्याच्या ठिकाणी होत असते. मानवाच्या दैनंदीन वापरापासून ते कृषी व उद्योगधंद्यासाठी पाण्याची आवश्यकता असते. ज्या प्रदेशात पाण्याची उपलब्धता अधिक आहे. अशा प्रदेशात मानवी वसाहत दाट आढळते.

अभ्यास क्षेत्रातील प्रवाह प्रणालीची घनता पुढील सुत्राच्या सहाय्याने काढली आहे.

$$\text{प्रवाह प्रणालीची घनता} = \frac{\text{प्रवाह प्रणालीची लांबी}}{\text{एकूण क्षेत्रफळ}} \times १००$$

वरील सुत्राला अनुसरुन अभ्यास क्षेत्रातील सज्जा निहाय प्रवाह प्रणालीच्या घनतेचे ०६ गटात विभागणी केली आहे. सारणी क्रमांक १.१ वरुन असे स्पष्ट होते की, प्रवाह प्रणालीची घनता प्रती १०० चौरस

किलोमीटरला ५० किलोमीटरपेक्षा कमी असलेल्या प्रदेशाने सर्वात जास्त २८.७ टक्के क्षेत्र व्यापले आहे. या गटामध्ये ग्रामीण वसाहतीची टक्केवारी २७.४ टक्के असून ग्रामीण वसाहतीची घनता प्रती १०० चौरस किमीला १४.९७ एवढी आहे. या गटामध्ये कोद्री, खादगाव, राणीसावरगाव, इसाद या प्रमुख सज्जांचा समावेश होतो. प्रवाहप्रणालीची घनता प्रती १०० चौरस किलोमिटरला ५० ते ६० किलोमिटर दरम्यान असलेल्या प्रदेशाने सुमारे १९.१ टक्के क्षेत्र व्यापले आहे. या गटामध्ये ग्रामीण वसाहतीची टक्केवारी १९ टक्के असून, ग्रामीण वसाहतीची घनता प्रती १०० किमीला १५,५६ आहे, या गटामध्ये शेळगाव, नरवाडी, चाटोरी, खोरस इ.प्रमुख सज्जांचा समावेश होतो.

प्रवाह प्रणालीची घनता प्रती १०० किलोमिटरला ६१ ते ७० किलोमिटर या दरम्यान असलेल्या प्रदेशाने सुमारे १४.२ टक्के क्षेत्र व्यापले आहे. या गटामध्ये कान्हेगाव, धारासूर, खळी, नरळद, गुजेगाव, फरकंडा, पिंपळगाव व नाव्हा या सज्जांचा समावेश होतो. प्रवाह प्रणालीची घनता प्रती १०० चौरस किलोमिटरला ७१ ते ८० किलोमिटर या दरम्यान असलेल्या प्रदेशाने सुमारे १७.२ टक्के क्षेत्र व्यापलेले आहे. या गटामध्ये ग्रामीण वसाहतीची टक्केवारी १४..१ टक्के असून ग्रामीण वसाहतीची घनता १०० चौकिमीला १२.८३ एवढी आहे. या गटामध्ये नैकोटा, धामोनी, गंगाखेड, मुळी, रुमनाजवळा, हरंगूळ, रावराजूर, गुळखंड व शेखराजूर या सज्जांचा समावेश होतो. प्रवाहप्रणाली घनता प्रती १०० चौरस किलोमिटरला ८१ ते ९० किमी पेक्षा जास्त असलेल्या प्रदेशाने सुमारे ७.७ टक्के क्षेत्र व्यापले आहे. या गटामध्ये ग्रामीण वसाहतीची टक्केवारी व्याप्त क्षेत्रापेक्षा ९.३ एवढी असून ग्रामीण वसाहतीची घनता प्रती १०० चौ.कि.मीला १८.७० एवढी आहे. या गटामध्ये शिर्शी (बु), मरडसगाव, सेलू, पोखर्णी देवी, पेठ पिंपळगाव या प्रमुख सज्जांचा समावेश होतो. प्रवाह प्रणालीची घनता प्रती १०० चौ.कि.मीला ९१ पेक्षा जास्त असलेल्या प्रदेशाने सुमारे १३.१ टक्के क्षेत्र व्यापले आहे. या गटामध्ये ग्रामीण वसाहतीची टक्केवारी व्याप्त क्षेत्राच्या टक्केवारीपेक्षा जास्त १५.७ एवढी आहे. या गटातील ग्रामीण वसाहतीची घनता प्रती १०० चौ.कि.मी. ला सर्वात जास्त १८.८६ एवढी आहे. या गटामध्ये सोनपेठ, विटा, आवलगाव, पोहंडूळ, माखणी, अंतरवेली, डोंगरगाव, शेळगाव, पिंपळदरी, उक्कडगाव या प्रमुख सज्जांचा समावेश होतो. (सारणी क्रमांक १.१)

**सारणी क्रमांक १.१**
**गंगाखेड तालुका (परभणी जिल्हा)**
**प्रवाहप्रणालीचे विभाग, व्याप्त क्षेत्र, ग्रामीण वस्तीची संख्या, त्यांची टक्केवारी आणि ग्रामीण वसाहतींची घनता**

| **अ. क्र** | **प्रवाहप्रणालीची घनता प्रती १०० चौ.कि.मी** | **व्याप्त क्षेत्र चौ.कि.मी** | **व्याप्त क्षेत्राची टक्केवारी** | **ग्रामीण वसाहतींची संख्या** | **ग्रामीण वसाहतींची टक्केवारी** | **ग्रामीण वसाहतींची घनता प्रती १०० चौ.कि.मी** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० पेक्षा कमी | ४५४.०२ | २८.७ | ६८ | २७.४ | **१४.९७** |
| २ | ५१-६० | ३०२.०० | १९.१ | ४७ | १९.० | **१५.५६** |
| ३ | ६१-७० | २२५.३६ | १४.२ | ३६ | १४.५ | **१५.९७** |
| ४ | ७१-८० | २७२.७२ | १७.२ | ३५ | १४.१ | **१२.८३** |
| ५ | ८१-९० | १२२.४१ | ७.७ | २३ | ९.३ | **१८.७०** |
| ६ | ९१ पेक्षा जास्त | २०६.७८ | १३.१ | ३९ | १५.७ | **१८.८६** |
| | एकूण | १५८३.२८ | १००.० | २४८ | १००.० | **१५.६६** |

स्त्रोत : संशोधकाद्वारा अधिकृत माहितीवर आधारीत

## निष्कर्ष

अभ्यास क्षेत्रातील नदीप्रवाह प्रणाली व ग्रामीण वसाहतीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, अभ्यास क्षेत्रात प्रवाह प्रणालीची घनता १०० चौरस किमी ५० किलोमिटरपेक्षा कमी असलेल्या विभागामध्ये २७.४ टक्के ग्रामीण वसाहती आहेत. तर प्रवाह प्रणालीची घनता दर १०० चौरस किलोमीटरला ९१ किलोमीटरपेक्षा जास्त असलेल्या विभामध्ये ग्रामीण वसाहतीची टक्केवारी १५.७ एवढी आहे. यावरुन अभ्यास क्षेत्रामध्ये प्रवाह प्रणालीची जास्त घनता असलेल्या प्रदेशात (उत्तरेकडील गोदावरीच्या तिरालगतच्या क्षेत्रात) वसाहतींची टक्केवारी कमी असून प्रवाह प्रणालीची घनता कमी असलेल्या क्षेत्रात वसाहतीची टक्केवारी जास्त दिसून येते.

## संदर्भ :

१) भारतीय जनगणना अहवाल १९८१,२००१.
२) दाते, य.रा. (१९४९): सुलभ विश्वकोश, भाग - २ प्रसाद प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.
३) सवदी,ए.बी. (२०११): भूगोलाची मुलतत्वे, निराली प्रकाशन, जळगाव.
४) Chavhan, T.S. (१९८७): Agricultural Geography, A Case Study of Rajasthan State, Academec Publisher, Jaipur.

५) Kankare, K.B. (१९८६): Marathwada: A Study in Settlement Geography Unpublished Ph.D Thesis.